जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ४१४ दिनांक - ०१/१०/२०२४

अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा

### गुटखा विक्री करणा-या इसमाकडुन ५,००,०००/- रुपये किंमतीचे गुटखा व इतर ऐवज जप्त

अंमली पदार्थ विरोधी पथक ०१ कडील पोलीस निरीक्षक श्री उल्हास कदम,सहा पोलीस निरीक्षक,राजकुमार केंद्रे, व स्टाफ असे दिनांक ३०/०९/२०२४ रोजी बिबवेवाडी पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात पेट्रोलिंग करीत असताना सुखसागर नगर लेन नंबर ०४ येथे एक लाल रंगाचा तिन चाकी पेगो टेम्पो वेगाने जात असताना दिसली सदर गाडीचा संशय आल्याने सदर गाडीचा पाठलाग करुन चिंतामणी रेसीडेन्सी समोर सुखसारगर नगर पुणे येथे थांबवुन गाडी चालक नामे **अक्षय तुकाराम सुरवसे वय ३० वर्षे, रा. बी-५८/७, सुपर इंदिरानगर, बिबवेवाडी पुणे** याची व त्याच्या ताब्यातील महिन्द्रा कंपनीची तिन चाकी पेगो टेम्पोची झडती घेतली असता त्याचे ताब्यात एकुण ५,२९,६००/- रु किंमतीचा ऐवज त्यामध्ये ४,७९,६००/-रु कि चा गुटखा हा तंबाखुजन्य पदार्थ, किं.रु. ५०,०००/- ची एक लाल रंगाचा तिन चाकी पेगो टेम्पो गाडी नं.एमएच १२ ई एफ ११९२ असा ऐवज व माल विक्री साठी बेकायदेशिररित्या जवळ बाळगताना मिळुन आला आहे.

त्याचे विरुध्द बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम १२३,२२३, २७४, २७५,सह सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनीमय) अधिनियम कलम ७ (२) व २० (२) अन्न सुरक्षा मानके अधिनियम कलम २००६,चे कलम २६(२)(i)(iv) चे उल्लंघन केल्याने कलम ५९प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे,श्री.निखिल पिंगळे, मा.सहा पो आयुक्त,गुन्हे १,श्री गणेश इंगळे यांचे मार्गदर्शना खाली अंमली पदार्थ विरोधी पथक,१ गुन्हे शाखा पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उल्हास कदम, सहा पोलीस निरीक्षक राजकुमार केंद्रे, पोलीस अंमलदार प्रविण उत्तेकर, संदिप शिर्के, सचिन माळवे, संदेश काकडे, दत्ताराम जाधव, विनायक साळवे, दयानंद तेलंगेपाटील, यांनी केली आहे.